





दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १७७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०८ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## लोखंडी पाईपांच्या वजनाखाली दोन जीव चिरडले !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मूर्तिजापूर (अकोला)** : कधी कोणाचे आयुष्य कोणत्या वळणावर संपेल, हे कोणालाच सांगता येत नाही. नागपूर-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी मध्यरात्री असाच एक काळजाचा थरकाप उडवणारा अपघात घडला. रस्ते अपघातांच्या मालिकेतील हे सर्वात भीषण आणि हळवे प्रकरण समोर आले असून, यामध्ये बुलढाण्यातील दोन तरुणांचा दुर्दैवी अंत झाला आहे.



**मृत्यूचा भीषण क्षण**

मिळालेल्या माहितीनुसार, लोखंडी पाईपने भरलेला एक आयशर ट्रक (क्र. MH-29-BF-6074) नागपूरकडून संभाजीनगरच्या दिशेने निघाला होता. कुरुम शिवारातील तीन पुलाजवळ हा ट्रक आला असताना, अचानक चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. मध्यरात्रीच्या गडद अंधारात ट्रक वेगाने डिव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेला गेला आणि थेट पुलालगत असलेल्या खोल दरीत कोसळला.

**पाईपांनीच घेतला बळी**

अपघाताची तीव्रता इतकी भयावह होती की, दरीत कोसळताना ट्रकमधील जड लोखंडी पाईप समोरच्या केबिनमध्ये घुसले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, हेच पाईप थेट चालक अनिसउद्दीन रफिकउद्दीन काझी आणि क्लिनर मोहम्मद रेहान मोहम्मद नाजिम यांच्या अंगावर कोसळले. पाईपांच्या प्रचंड वजनाखाली चिरडले गेल्यामुळे या दोघांचाही जागीच अंत झाला. जोहर नगर, बुलढाणा येथील राहणारे हे दोन तरुण घरासाठी कमवायला निघाले होते, मात्र वाटेतच काळाने त्यांच्यावर झडप घातली.

**पोलिसांची धाव आणि बचावकार्य**

अपघाताचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी माना पोलिसांना माहिती दिली. ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. क्रेनच्या साहाय्याने ट्रक आणि लोखंडी पाईप बाजूला करून मृतदेह बाहेर काढण्यात आले. या प्रक्रियेदरम्यान काही वेळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती, जी पोलिसांनी ताकदीने सुरळीत केली. प्राथमिक तपासात अतिवेग किंवा डुलकी लागल्यामुळे हा अपघात झाला असावा, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. या घटनेमुळे बुलढाणा शहरात आणि मृतांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे.

## पहिलाच सामना गमावण्याची वेळ !

### लीडर सूर्याने खेळ सांभाळत मिळवला विजय !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई** : टी-२० विश्वचषकातील भारत आणि अमेरिका यांच्यात सामना रंगला. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर हा सामना रंगला. अमेरिकेने नाणेफेक जिंकून प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारताने १६१ धावा केल्या याउलट अमेरिकेला १३२ धावा करता आल्या. अमेरिकेच्या गोलंदाजाने भारताच्या फलंदाजांना एकामागून एक धक्के दिले तरीही भारताने सामना २९ धावांनी जिंकला.




भारताने आपल्या विश्वचषक मोहिमेची सुरुवात मोठ्या विजयाने केली. टीम इंडियाने अमेरिकेला २९ धावांनी पराभूत केले. हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने १६१ धावा केल्या. प्रत्युत्तरात, यूएसए संघ निर्धारित २० षटकांत फक्त १३२ धावा करू शकला. कर्णधार सूर्यकुमार यादवने ८४ धावांची सामना जिंकणारी खेळी खेळली. अमेरिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अमेरिकन गोलंदाजांनी भारतीय फलंदाजांना मोठे फटके मारण्यापासून रोखले. अभिषेक शर्मा आणि शिवम दुबे यांना त्यांचे खातेही उघडता आले नाही. तिलक वर्मा २५ आणि इशान किशनने २० धावा केल्या, परंतु कर्णधार सूर्यकुमार यादवने ८४ धावांची नाबाद खेळी केली. त्याने हे अर्धशतक ४९ चेंडूत पूर्ण केले. जर कर्णधार सूर्याने चांगली कामगिरी केली नसती तर टीम इंडिया १३०-१४० धावांपर्यंत मर्यादित राहिली असती. भारताकडून सर्वाधिक विकेट या मोहम्मद सिराजने काढल्या. त्याने सर्वाधिक तीन विकेट्स काढल्या. अर्शदिप सिंग आणि अक्षर पटेल यांनी दोन विकेट्स काढल्या. वरुण चक्रवर्तीला एक विकेट काढता आली.


अमेरिकेच्या संघाकडून शॅडली व्हॅन शाल्कविकने चमक दाखवली, त्याने एकाच षटकात इशान किशन, तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांना बाद केले. त्याने चार षटकात २५ धावा देत चार विकेट्स घेतल्या. हरमीत सिंगनेही दोन विकेट्स घेतल्या. २०२६ च्या टी-२० विश्वचषकातील हा भारतीय संघाचा पहिला विजय आहे. त्याआधी पाकिस्तान आणि वेस्ट इंडिजनेही त्यांचे पहिले सामने जिंकले आहेत.

## बल्लारपुरातील बीटीएस प्लॉट चौकात भीषण अपघात

### ट्रकच्या धडकेत पत्नीचा मृत्यू तर पती जखमी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, बल्लारपूर (चंद्रपूर)** : गोंडपिपरीहून चंद्रपूरकडे मोपेडने जात असताना बल्लारपूर शहरातील बीटीएस चौकात भीषण अपघात घडला. या संदर्भात सूत्रांच्या माहितीनुसार ५ फरवरी ला दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान सदर अपघात घडला या अपघातात निलिमा देवराव रोहनकर (३८), रा. छोटा बाजार वॉर्ड, चंद्रपूर यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे पती देवराव रोहनकर हे अपघातात जखमी झाले आहेत.




प्राप्त माहितीनुसार, रोहनकर दाम्पत्य मोपेड गाडी क्रं एमएच ३४ सीपी २४१७ ने गोंडपिपरी ते चंद्रपूर कडे प्रवास करत असताना ओव्हरटेक करत असलेल्या ट्रकने धडक दिली. धडकेनंतर ट्रकचे मागील चाक निलिमा रोहनकर यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर अपघातात पती उसळून बाजूला पडल्याने त्यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली आहे. संबंधित ट्रक क्रं एमएच ३३ टी ३८३६ लोहखनिज घेऊन घुग्गुसकडे जात असल्याचे सांगितले जाते.

मृत निलिमा रोहनकर व त्यांचे पती काल गोंडपिपरी तालुक्यातील जयरामपूर येथे घराच्या वास्तुसाठी गेले होते. त्यांच्या पश्चात २१, १८ व १६ वर्षांच्या तीन मुली आहेत. मोठ्या मुलीचा मागील महिन्यात साक्षगंध पार पडला असून तिचा विवाह येत्या ७ मे रोजी होणार आहे. या दुर्घटनेमुळे रोहनकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच बल्लारपूर पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, बल्लारपूर येथे पाठविण्यात आला आहे. प्राथमिक तपास पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक मदन दिवटे व पोलीस हवालदार यशवंत कुमरे करीत आहेत.

## औषधांच्या बॉक्समधून अवैध दारूची तस्करी ! तलासरी पोलिसांनी केला पर्दाफाश

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०७, तलासरी (पालघर)** : पालघर जिल्ह्यात अवैध दारू वाहतुकीविरोधात तलासरी पोलिसांनी मोठी आणि धक्कादायक कारवाई करत औषधांच्या बॉक्सआडून सुरू असलेल्या दारू तस्करीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी टेम्पोसह तब्बल ₹३६ लाख २८ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.



पोलीस अधीक्षक पालघर श्री. यतिश देशमुख यांनी जिल्ह्यात अवैध मद्यविक्री व वाहतुकीविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने दि. ०४ फेब्रुवारी २०२६ रोजी तलासरी पोलीस ठाण्याला मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरून मुंबईकडे जाणाऱ्या एका टेम्पोमधून मोठ्या प्रमाणात अवैध दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे तलासरी पोलीस ठाण्याच्या पथकाने तत्काळ महामार्गावर सापळा रचत एमएच-०४-जेके-१३०२ क्रमांकाचा टेम्पो अडवला. वाहनाची चौकशी केली असता चालकाने वाहनात उळश्रिर क्शरश्रींह कंपनीची औषधे असल्याचे सांगून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी संशय बळावल्याने वाहनाची सखोल झडती घेतली असता औषधांच्या बॉक्समध्ये लपवून ठेवलेली, महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेली दारू मोठ्या प्रमाणात आढळून आली. या प्रकरणी वाहनचालक शिवकुमार लालबाबू ठाकूर (वय ४३), व्यवसाय - चालक, रा. साकीनाका, मुंबई (मूळ रा. पिपरा, जि. पूर्व चंपारण, राज्य - बिहार) यास ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी टेम्पो व त्यातील अवैध दारूसह एकूण ₹३६,२८,३२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. ३०/२०२६ नुसार महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(अ)(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. या तस्करीमागे आणखी कोण कोण सहभागी आहेत, तसेच दारू कुठून आणली व कुठे पोहोचवली जाणार होती, याबाबतचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. जयराम उमतोल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरे, उपविभागीय पोलीस अधिकारी विकास नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक अजय गोरड आणि तलासरी पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांच्या संयुक्त पथकाने केली आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध अमली पदार्थांचा सुळसुळाट

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.७, अहिल्यानगर** : अहिल्यानगर शहर व जिल्ह्यात ड्रग्ज व इतर अमली पदार्थांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली असून यामुळे युवक वर्ग नशेच्या आहारी जात असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप यांनी शेकडो कार्यकर्ते व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह शुक्रवारी (६फेब्रुवारी) पोलीस अधीक्षक कार्यालयात भेट देत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन दिले. अवैध ड्रग्ज तस्करीविरोधात तात्काळ व कडक कारवाई करावी, अन्यथा पोलीस प्रशासनाविरोधात मोठे आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.



आ. जगताप म्हणाले, पोलिसांनी छापा टाकून जप्त केलेले ड्रग्ज पोलिसानेच विक्री केल्याची बाब समोर आली. पुणे पोलिसांनी हा प्रकार उघडकीस आणला. हा गंभीर प्रकार नगर पोलिसांच्या लक्ष्यात आला नाही. ड्रग्जच्या वाढत्या उपलब्धतेमुळे युवकांकडून नशेच्या अधीन राहून विविध गैरकृत्ये घडत असून समाजस्वास्थ्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. ड्रग्ज पुरवठा करणार्यांबाबत पोलीस प्रशासनाला माहिती मिळत असूनही त्यावर अपेक्षित ती ठोस कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

नुकतीच जिल्ह्यात 'एमडी' ड्रग्ज प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली होती. मात्र त्यानंतर ही कारवाई वादाच्या भोवर्यात सापडल्याने मूळ पुरवठादारांपर्यंत पोलीस पोहोचू शकले नाहीत, अशा तक्रारी नागरिकांकडून पुढे येत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महापालिका निवडणुकीच्या काळात बोल्हेगाव परिसरातील आठ युवकांनी ड्रग्जचे अति सेवन केल्याने त्यांना रूग्णालयात दाखल करावे लागले होते. मात्र याविषयी देखील पोलीस प्रशासनाकडून ठोस दखल घेण्यात आली नाही, ही अत्यंत गंभीर व दुर्दैवी घटना असल्याचे आ. जगताप यांनी सांगितले.

युवकांमध्ये वाढलेल्या बॉडीबिल्डिंग क्रेझच्या पार्श्वभूमीवर अनेक जिममध्ये स्टेरॉईडच्या नावाखाली नशेची इंजेक्शने दिली जात असल्याच्या तक्रारीही मोठ्या प्रमाणात येत असल्याचे नमूद करण्यात आले. यापूर्वी अशा इंजेक्शनचा मोठा साठा जप्त केला असला तरी अद्यापही ही इंजेक्शने सहज उपलब्ध होत असल्याने केलेल्या कारवाईतून समूळ उच्चाटन झाले नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## रितू तावडे यांना मुंबईच्या महापौरपदाची उमेदवारी घोषित

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई** : भारतीय जनता पक्षाकडून रितू तावडे यांना मुंबईच्या महापौरपदाची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. महायुतीचे संख्याबळ पाहता घाटकोपरमधील प्रभाग क्रमांक १३२ च्या नगरसेविका रितू तावडेंचा विजय निश्चित मानला जात होता. अशातच आता ठाकरे गटानेही मोठा निर्णय घेतला आहे.

महापौरपदाच्या लढतीत न उतरण्याची भूमिका मुंबईच्या माजी महापौर आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी जाहीर केली. उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी खासदार संजय राऊत, किशोरी पेडणेकर यांच्यासह प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत ठाकरेसेनेने महायुती विरोधात उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला. रितू तावडे मराठी असल्याने अपशकुन न करण्याचं वक्तव्य पेडणेकरांनी केलं.

**किशोरी पेडणेकर काय म्हणाल्या?**

२०२२ पासून जी लढाई चालू होती, त्यात भले ८३ ते ८९ झाले, पण मराठी माणूस मुंबईत जिंकला आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्याच नावावर मुंबईत जो जनादेश मिळाला, ते नाव कोणी गरजेपुरतं वापरतंय, ते लोकांना दिसतंय, त्यामुळे आमची लढाई मराठीच्या अस्मितेसाठी होती. ती कायम लढत राहू, भाजपने मराठी महापौर दिलाय, तर आम्ही अपशकुन करणार नाही. असं सूचक वक्तव्य किशोरी पेडणेकर यांनी माध्यमांशी बोलताना केलं. आम्हाला आकड्यांची गणितं मान्य असतात आणि यावेळीही ती मान्य केलेली आहेत. पण आम्ही सक्षम विरोधीपक्ष नेता म्हणून.. जसं सत्तेत असतानाही पूर्वी आम्हाला विरोधी पक्षाच्या भूमिका बजावाव्या लागल्या आहेत, तशी आताही ती भूमिका पद्धतशीर, नीटनेटकी, कुठल्याही दबावाला किंवा आमिषाला बळी न पडता, प्रत्येक नगरसेवक आपल्या प्रभागातील प्रश्न मांडतील, भांडतील, मुंबईच्या भल्यासाठी जे जे आहे, ते ते करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. असं पेडणेकर यांनी सांगितलं.

# पाकचा संघ स्पर्धेत खेळो अथवा न खेळो.. कोण बनणार चॅम्पियन..?



**रविवार विशेष..**

भारत-श्रीलंकेच्या रत-शीलंकेच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत भाग घेण्यासाठी जगातले २० संघ सज्ज झाले आहेत. आजपासून या विश्वचषकाच्या साखळी फेऱ्यांना सुरुवात होत आहे. यजमान भारतीय संघ या स्पर्धेत गतविजेत्याच्या रुपात दिमाखात प्रवेश करेल. भारताने २०२४ मध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिकेने संयुक्तपणे आयोजित केलेला टी-२० विश्वचषक जिंकला होता. तत्कालीन कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली जिंकलेला हा विश्वचषक अनेक अर्थानी वैशिष्ट्यपूर्ण ठरला होता. कारण, त्याआधी अवघ्या काही महिन्यांपूर्वी २०२४ मध्ये भारतातच झालेल्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाकडून पराभव स्वीकारावा लागला होता. संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावणारा भारतीय संघ तो एकदिवसीय विश्वचषक सहज जिंकेल असे चाहत्यांना ठामपणे वाटत होते. हा सामना बघायला भारत आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधानदेखील स्टेडियममध्ये उपस्थित होते. परंतु, भारतीय संघ तो सामना हरला. ही कसर २०२४ च्या टी-२० विश्वचषकातून भरून निघाली.

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात, आजपर्यंत कोणत्याही संघाला सलग दोन टी-२० विश्वचषक जिंकता आलेले नाहीत. भारतीय संघ हा विश्वचषक जिंकून नवा रेकॉर्ड प्रस्थापित करेल का याकडे अर्थातच सगळ्या भारतीयांचे लक्ष असेल. भारतीय संघाच्या बाबतीत सांगायचे झाल्यास रोहित शर्मा, विराट कोहली, रवींद्र जडेजा, ऋषभ पंत आदी टी-२० स्पेशलिस्ट खेळाडूंची जागा नवीन प्रतिभावंत खेळाडूंनी घेतली आहे. या संघात २०२४ च्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा भाग असलेले ८ खेळाडू आहेत, तर ७ नवीन नव्या दमाचे खेळाडू आहेत. यावेळचा टी-२० विश्वचषक भारतीय संघ सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळेल. गेल्या टी-२० विश्वचषकानंतर भारतीय संघाने एकही मालिका गमावलेली नाही हे विशेष. भारतीय संघाची फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण सगळेकाही फॉर्मात आहे. भारतीय संघात जगातला नंबर वन टी-२० फलंदाज अभिषेक शर्मा आणि नंबर वन गोलंदाज वरुण चक्रवर्ती यांचाही समावेश आहे. त्यामुळे भारतीय संघ या विश्वचषकाचा प्रमुख दावेदार मानला जात आहे. त्याशिवाय ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान या संघांवरही सगळ्यांची नजर असेल. तर, स्पर्धेत अफगाणिस्तान, वेस्ट इंडिज, आयर्लंड, यूएई, यूएसए, नेदरलँड्स, स्कॉटलँड्स, झिम्बाब्वे आदी अंडरडॉग संघही आहेत. गेल्या वेळच्या विश्वचषकात यूएसएने पाकिस्तानला हरवून सगळ्यांचेच लक्ष वेधून घेतले होते.

या वेळचा विश्वचषक सुरू होण्याआधी वादाच्या मालिकांना सुरुवात झाली होती. गेल्या वर्षी पाकिस्तान यजमान असलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारताने सुरक्षेच्या कारणांमुळे पाकिस्तानात जायला नकार दिला होता. त्याचा राग मनात धरून असलेल्या पाकिस्तानने भारतातली विश्वचषक स्पर्धा कशी खराब करता येईल,




यासाठी बरेच प्रयत्न केले. सुरुवातीला सुरक्षेचा हवाला देत पाकिस्तानने भारतात खेळण्यास नकार दिला, तेव्हा भारताने श्रीलंकेसोबत यजमानपद वाटून घेत पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेत हलवले. पाकिस्तान सेमीफायनल किंवा फायनलमध्ये जरी आला, तरी त्यांचे सामने श्रीलंकेत होतील, असे नियोजन करत पाकिस्तानचा विरोध मोडीत काढला. यानंतर कटकारस्थान करत पाकिस्तानने बांगलादेशला भारतात न खेळण्यासाठी उकसवले. पाकिस्तानप्रमाणेच आपलेही सर्व सामने श्रीलंकेत हलवा अशी मागणी बांगलादेश करू लागला. तेव्हा खेळायचे तर खेळा नाहीतर स्पर्धेबाहेर व्हा म्हणत आयसीसीने बांगलादेशला सरळ विश्वचषकाच्या स्पर्धेतूनच चालते केले आणि त्यांच्याजागी स्कॉटलँडच्या संघाला स्पर्धेत थेट प्रवेश दिला. यामुळे बांगलादेशची जिरली असली, तरी पाकिस्तान अजूनही नरमलेला नाही. बांगलादेशची स्पर्धेतून हकालपट्टी केल्याचा निषेध म्हणून पाकिस्तानने भारतासोबतच्या सामन्यावर बहिष्कार घालण्याचे ठरवले आहे. भारत-पाकिस्तान-बांगलादेशचा मुद्दा आता क्रिकेटपुरता मर्यादित राहिलेला नाही. बांगलादेशमध्ये भारतविरोधी नारेबाजी करत अल्पसंख्याकांना लक्ष्य केले जात आहे. तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत केल्यापासून चीन व पाकिस्तानधार्जिणे बांगलादेशी सरकार सातत्याने भारतविरोधी भूमिका घेताना दिसते. त्यांना अर्थातच पाकिस्तानकडून वेळोवेळी फूस दिली जात आहे.

कोलकाता नाईट रायडर्स संघाने बांगलादेशी खेळाडू मुस्तफिजूर रेहमानला बाजूला करताच बांगलादेशला भारतविरोधात आगपाखड करायला निमित्त मिळाले होते. आयसीसीने बांगलादेशच्या मुसक्या आवळल्या असल्या, तरी पाकिस्तानचा थयथयाट अजून कमी झालेला नाही. नियमानुसार कुठल्याही संघाला एक सामना न खेळण्याची मुभा असते, त्याच नियमाचा फायदा उचलून पाकिस्तानने भारतावर बहिष्काराचे अस्त्र उगारले आहे. भारत-पाक क्रिकेट सामना म्हणजे हायव्होल्टेज ड्रामा. हा सामना रद्द झाल्यास ब्रॉडकास्टर्सना कोट्यवधी रुपयांचा तोटा होऊ शकतो. तोट्याच्या वसुलीसाठी ब्रॉडकास्टर्सने आयसीसीकडे दाद मागितल्यास नुकसानीची भरपाई करण्यासाठी आयसीसी पाक क्रिकेट बोर्डाचा निधी थांबवू शकते, दंड आकारू शकते किंवा आंतरराष्ट्रीय सामन्यांवरही बंदी घालू शकते, याची पाक क्रिकेट बोर्डाला चांगलीच जाणीव आहे. पाक बोर्डाने अद्याप सामना न खेळण्याबाबत कुठलेही अधिकृत पत्र आयसीसीला दिलेले नाही. बांगलादेशमध्ये १२ फेब्रुवारीला निवडणुका व्हायच्या आहेत, तोपर्यंत बहिष्काराच्या नावाखाली पाक झुलवत राहील आणि ऐनवेळी सामना खेळेल असाही एक तर्क दिला जातोय. असा प्रकार त्यांनी आशिया चषकात अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात केला होता. भारताने हात न मिळवल्याच्या रागातून तासभर उशिराने पाकचा संघ सामना खेळायला उतरला होता. त्याची पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता आहे. पाकचा संघ स्पर्धेत खेळो अथवा न खेळो भारतीय संघाला त्याने काहीही फरक पडणार नाही. कारण या रणसंग्रामात राजकीय डावपेचांपेक्षा क्रिकेटच्या मैदानावर प्रत्यक्षात कोण किती सरस खेळ खेळतो यावर सामन्याचा निकाल अवलंबून असेल. भारतीय संघ पूर्ण तयारीनिशी त्यासाठी तयार आहे.

## बांगलादेश, इराण व कट्टरतावाद

धर्माच्या आधारे निर्माण झालेल्या पाकिस्तानचा १९७१च्या युद्धातील पराभव हा केवळ लष्करी नव्हे, तर सांस्कृतिक आणि भाषिक अस्मितेचा विजय होता. बंगाली भाषा व संस्कृतीच्या आधारावर शेख मुजीबुर रहमान यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशची निर्मिती झाली. उर्दू लादण्याच्या धोरणाविरोधात उभे राहिलेले बंगाली आंदोलन हे त्या लढ्यात निर्णायक ठरले होते. १९७० च्या निवडणुकीतील स्पष्ट जनादेश आणि त्याकडे पाकिस्तानच्या लष्कराने केलेले दुर्लक्ष यामुळे मुक्ती संग्राम अपरिहार्य ठरला. भारताच्या निर्णायक हस्तक्षेपामुळे बांगलादेश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर मात्र लष्करी हस्तक्षेप, मुजीबुर रहमान यांची हत्या आणि झिया ऊर रहमान यांचा राजकीय उदय यामुळे तेथील लोकशाही संकुचित झाली. पुढे मुजीबुर यांच्या कन्या शेख हसीना यांनी सत्तेत येऊन देशाला राजकीय स्थैर्य देवून धर्मनिरपेक्षतेकडे नेण्याचा प्रयत्न केला. भारत-बांगलादेश संबंध त्यांच्या कारकिर्दीत अत्यंत दृढ झाले. आता तेथील राजकीय परिस्थितीत महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत.

गेल्या दशकभरात वस्त्रोद्योगामुळे, आर्थिक विकासामुळे बांगलादेश सापेक्ष स्थिरतेकडे वाटचाल करीत असताना २०२४ मधील विद्यार्थ्यांच्या नेतृत्वात झालेल्या जनआंदोलनामुळे येथील राजकीय व्यवस्थेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. तथापि, दीर्घकाळची एकछत्री सत्ता, विरोधकांवरील दडपशाही, बेरोजगारी आणि सामाजिक असंतोष यामुळे हसीना यांची कारकीर्द वादग्रस्त ठरली. हसीना यांनी देखील सत्तेत टिकून राहण्यासाठी काही प्रमाणात इस्लामिक गटांशी समझोता केला होता. त्यात धार्मिक शिक्षणावर भर, काही इस्लामिक कायद्यांची पुनर्स्थापना, आणि इस्लामिक पक्षांशी राजकीय सौदेबाजी आदी बाबींचा समावेश होता. मात्र क्रांतीनंतर कट्टरतावाद्यांना आपले उद्दिष्ट साधण्यासाठी खुला अवकाश प्राप्त झाला आहे. अवामी लीगची मध्यवर्ती भूमिका बांगलादेशचे राजकारणात राज्यसंस्था व राष्ट्रवाद निर्मितीत महत्त्वाची राहिलेली आहे.

बांगलादेशमध्ये या महिन्यात सार्वत्रिक निवडणुका होत आहेत. तीत शेख हसीना देशाबाहेर आहेत; तर बेगम खालिदा झिया यांचे नुकतेच निधन झाले आहे. गेल्या तीन दशकांत बांगलादेशच्या राजकारणास आकार देण्यात या दोन्ही नेत्यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांच्या अनुपस्थितीत निर्माण झालेल्या अवकाशाचा फायदा जमाते इस्लामी घेऊ पाहत आहे. जगातील सर्वांत मोठी – म्हणजे चौथ्या क्रमांकाची चार हजार चौरस किलोमीटपेक्षा जास्त भू-सीमा दोन्ही देशांत आहे. लोकशाही विरोधी गटांचा वाढता प्रभाव, अस्थिर हंगामी सरकार या बाबींमुळे भारतासाठी बांगलादेश हा काळजीचा विषय होतो आहे. आज बांगलादेशातील राजकीय अस्थिरता, चीन व पाकिस्तानचा संभाव्य हस्तक्षेप, भारतविरोधी शक्तींचा वाढलेला प्रभाव हे भारतासाठी काळजीचे विषय ठरले आहेत. त्यामुळे बांगलादेशातील राजकीय स्थैर्य आणि जनभावना यांचा समतोल राखणे हेच पुढील काळातील खरे आव्हान ठरणार आहे.

दुसरीकडे इराणमध्ये १९७९ पासून सत्तेत असलेल्या खामेनी राजवटीविरुद्ध तेथील तरुण पिढी व महिला वर्गाचा संघर्ष सुरू आहे. सध्या इराणला महागाई आणि आर्थिक अस्थिरतेचा सामना करावा लागत आहे. इराणचे चलन 'रियाल' हे फारच कमकुवत झाले आहे; इतके की, आपला एक रुपया म्हणजे अकरा हजार रियाल! आंतरराष्ट्रीय पातळीवर बंधने घालून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प इराणची कोंडी करीत आहेत. तर इस्रायलची गुप्तचर संघटना आंदोलकांना आवश्यक रसद पुरवीत आहे. इस्रायलसोबतच्या बारा दिवसीय संघर्षात जून २०२५ मध्ये अमेरिकेने इराणच्या अणुप्रकल्पावर हल्ला केला त्यावेळी खामेनी यांची इराणवरील पकड ढिली होईल याचा अंदाज आला होता.

सध्या सुरू असलेल्या आंदोलनाची सुरुवात डिसेंबरमध्ये महागाईविरोधात किरकोळ विक्रेत्यांनी तेहरानमध्ये सुरू केलेल्या निदर्शनांपासून झाली. नंतर या आंदोलनाचे लोण देशभर पसरले. यांत आत्तापर्यंत हजारो नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. इराणमध्ये २००९ मध्ये राजकीय सुधारणांकरिता आंदोलन झाले होते. तर २०१९ मध्ये तेलाचे दर वाढले, त्या विरोधातील संतापातून आंदोलनास सुरुवात झाली होती. २०२२चे आंदोलन हे राजकीय हत्येविरोधातील होते. या सर्व आंदोलनात मोठ्या संख्येत नागरिकांना आपल्या प्राणास मुकावे लागले होते. सध्या जरी आंदोलन नियंत्रित करण्यात सरकारला यश मिळत असले तरी सरकारपुढील अडचणी कमी झालेल्या नाहीत. इराणची सीमा १३ देशांना लागून आहे. भविष्यातील इराणमधील बदलांमुळे मध्य-पूर्वेतील भू-राजकीय समीकरणे पाश्चिमात्य देशांच्या बाजूने बदलू शकतात. भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेकदा इराणकडून मदत झाली आहे. इराण हा भारताचा मुख्य तेल पुरवठादार होता. आपण जवळपास दहा टक्के तेल इराणकडून आयात करीत होतो. मात्र, अमेरिकेने निर्बंध लागू केल्यामुळे २०१९ पासून भारताने इराणकडून होणारी आयात बंद केली. आता ट्रम्प यांनी भारताने युक्रेन प्रश्नामुळे रशियाकडून तेल आयात करण्याबाबत उघड नाराजी व्यक्त केल्यामुळे भारत इराणला चाचपून पाहण्याचा प्रयत्न करीत असताना पुन्हा समीकरणे बदलली आहेत. याखेरीज भारताने चाबहार बंदरासाठी केलेली गुंतवणूकदेखील महत्त्वाची आहे. थोडक्यात, अमेरिकेची धोरणे भारत-इराण यांच्या हितांच्या आड येत आहेत. बांगलादेश हा आत्तापर्यंत पाश्चात्त्य समर्थक, धर्मनिरपेक्ष देश समजला जात होता. अमेरिकेच्या इंडो-पॅसिफिक रणनीतीचा भाग म्हणून बांगलादेशला विशेष महत्त्व आहे. चीन बांगलादेशमध्ये मोठ्या प्रमाणावर 'बेल्ट अँड रोड' प्रकल्पात भरीव गुंतवणूक करून प्रभाव वाढवतोय. बंदर विकास व सर्व प्रकल्पांतील चीनची गुंतवणूक एकूण ४२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली आहे. पाकिस्तानचे इराणशी संबंध तणावग्रस्त आहेत, तर सौदी अरेबिया व यूएई हे देश शिया प्रभुत्व असलेल्या इराणला विरोध करीत असतात.

# ब्रम्हांडनायक योगी गजानन

प्राचीनकाळी शृंग मुनींनी वसविलेल्या शिवगांवात अर्थात आजच्या शेगावात माघ वद्य सप्तमी दिनांक २३ फेब्रुवारी १८७८ला योगी गजानन अवतीर्ण झाले. म्हणून तो दिवस संत गजानन महाराजांचा ' प्रकट दिन' म्हणून ओळखल्या जातो. ज्या- ज्या वेळेस धर्माला ग्लानी,मरगळ येते आणि अनीतीचा मार्ग अवलंबिला जातो. नाना प्रकारच्या यातनेने लोक गांजलेले असतात, तेव्हा साक्षात ईश्वर कुठल्या ना कुठल्या योनी वांचून भूतलावर प्रकट झालेले आहे. जसे की,गोरक्षनाथ जन्मले उकिरड्यात, कानिफनाथ गजकर्णात, चांगदेव नारायण डोहांत अगदी त्याचप्रमाणे संत गजानन शेगावात उष्ट्या पत्रावळीवरील शीते वेचतांना प्रकट झाले.

अन्नम् ब्रम्हेती हे उपनिषदामधला वचनं म्हणत योगी गजानन उष्टापत्रावळीतील शेती वेचून खात होते.अन्नाचे महत्त्व विशद करणारा उपनिषदा मधला वचनं गाणारा हा साधा पुरुष असू शकत नाही. हे सर्वप्रथम शेगावचे सद्गृहस्थ बंकटलाल आगारवाल व दामोदरपंत कुलकर्णी यांच्या लक्षात आले. इथूनच पुढे श्री गजाननाच्या योगीपणाची खुण पटावयास प्रारंभ झाला. ते सतत दिगंबर अवस्थेत भटकंती करायचे.बोटांच्या चुटकीने गण गण गणांत बोतेअसे सूत्रमय भजन सतत गात असत. या भजनाचा भावार्थ श्रीदासगणू महाराजांनी श्री गजानन विजय ग्रंथाच्या नवव्या अध्यायामध्ये विशद केला आहे, ते पुढील प्रमाणे –

**त्या सूत्ररूप भजनाचा ।**<br>**अर्थ असा वाटतो साचा ।**<br>**गणी या शब्दाचा ।**<br>**अर्थ मोजी हाच असे ।।**

**जीवात्मा म्हणजे गण ।**<br>**तो ब्रह्माहुनी नाही भिन्न ।**<br>**हे सुचवावया कारण ।**<br>**गणांत हा शब्द असे ।।**

**बोते हा शब्द देखा ।**<br>**अपभ्रंश वाटे निका ।**<br>**बोते हा शब्द ऐका ।**<br>**तेथे असावा नि :संशय ।।**

**बाया शब्दें करून ।**<br>**घेतले पाहिजे मन ।**<br>**ते हे सर्वनाम ।**<br>**शब्दांऐवजी आलेलें ।।**

**म्हणजे मना समजे नित्य ।**<br>**जीव हा ब्रह्मास सत्य ।**<br>**मानूं नको तयाप्रत ।**<br>**निराळा त्या तोचि असे ।।**

**गिण गिण गिणांत बोते ।**<br>**कोणी गणी गणी गणांत बोते ।**<br>**ऐसी आहेत दोन मते ।**<br>**या भजनांविषयी शेगावीं ।।**

संत हे भूमीवरचे चालते बोलते ईश्वर आहे संत आनंदघन दयेचा सागर,वात्सल्यमूर्ती आहे. संत कसे असावे या आशयाचा एक मुक्ताईचा 'अभंग' आहे.

**संत तोचि जाणा जगी ।**<br>**दया क्षमा ज्याचे अंगी ।।**

अगदी अशाच पात्रतेचे समर्थ गजानन होते.



ते ज्या वर कृपाछत्र ठेवतात त्यांच्या जीवनाचा उद्धार होतो. महाराजांनी अनेक भक्तांच्या ईच्छा हेतू अरिष्ट लीलया करून पुरविल्या आहेत. एके दिवशी महाराजांच्या निसिम भक्त बंकटलाल यांच्यासोबत गजानन महाराज मक्याची कणसें खाण्यासाठी सहकाऱ्यांसोबत मळ्यावर गेले होते. चिंचेच्या झाडाखाली कणसें भाजण्यास सुरुवात केली. त्या धुरांमुळे त्या चिंचेच्या झाडावरील मोहोळांच्या माशा उठल्या आणि इतर सहकाऱ्यांना चावा घेऊ लागल्या. भक्तांची दैना झाली. सैरावैरा पळू लागली. अशावेळी गजानन स्वामी ध्यानस्थ बसून राहिले, आणि त्या माशांबद्दल चित्ताने विचार करू लागले.

**माशा तरी मीच झालो ।**<br>**मोहोळ तरी मीच झालो ।**<br>**कणसें तरी रूप माझे ।।**

अशा विचारांमध्ये आनंदात मधमाशांचे डंक स्वतःवर सहन करून घेतले व भक्तावर आलेले संकट टाळले.मधमाशांना परत पाठविले.

ज्याप्रमाणे स्वराज्य स्थापनेसाठी समर्थ रामदास स्वामींचे छत्रपती शिवाजी महाराजांना मार्गदर्शन लाभले, तद्वतच समर्थ गजानन महाराजांनी लोकमान्य टिळकांना सुद्धा शुभाशीर्वाद दिलेत. पुढे ते भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील लोकमान्य बनले. स्वातंत्र्यासाठी कारावास भोगून मंडलेच्या तुरुंगातच त्यांनी 'गीतारहस्य' नावाचा ग्रंथ श्री गजाननाच्या कृपेने पूर्ण केला. संतवाणी कधीच फोल ठरत नाही.अगदी हेच टिळकांच्या बाबतीत खरेच ठरले.

संत हे जड- जीवांच्या उद्धारासाठी सदैव झटतात. भरकटलेल्या समाजाला दिशा दर्शविण्याचे अनमोल कार्य करतात.आपल्या वाणीने, आचरणाने, बोधाने, दंडाने समाजाला उपदेशामृत पाजतात. संत हे चमत्कार घडवितात असे नव्हे, तर त्यांच्या हातून घडलेली कृती आजच्या समाजाला चमत्कारिक वाटते. संतांच्या लीला ह्या समाजातील दृष्ट प्रवृत्ती दांभिकता, पाखंड, षड्विकार घालवण्यासाठी तर प्रेम, करुणा जीवा- शिवाची पुर्नस्थापना करण्यासाठी आहे. वाममार्गाला लागलेल्या जीवाला सदमार्ग दर्शविण्याचे कार्य संतश्रेष्ठ गजानन स्वामी करीत राहिले. त्यांचे अवतार कार्य समजून घेण्यासाठी त्यांच्याविषयी लिहिल्या गेलेल्या चरित्र ग्रंथाचे अध्ययन करणे गरजेचे ठरते. तिथे माझ्यासारख्या पामराचे शब्द अपुरे पडतात. संत तुकारामांच्या शब्दात सांगायचे झाल्यास –

**संतांचा महिमा तो बहु दुर्गम ।**<br>**शाब्दीकांचे काम नाही येथे ।।**

**- शशिकांत तोटे**<br>**दारव्हा, जि.यवतमाळ**<br>**मो :९१३०८३५४५८**

### गजानना

येता इच्छा तव मना<br>बोलावशी तू दर्शनां<br>खेळ तुझे तुचं जाणे<br>शेगावच्या गजानना

भेट तव अशक्यप्राय<br>काहीनं आदेशाविना<br>हाकमारी चला याना<br>घालूनिया शामियाना

शेगावीजाऊन आलो<br>आम्हीकरतो वल्गना<br>तोचिकरता करविता<br>साधका कुठे कल्पना

ओढ स्वामी दर्शनाची<br>विशुद्ध तृप्ती भावना<br>स्वामी मुख स्वर्गसुख<br>पुरी होते मनोकामना

नामकरण करी राणा<br>कार्यातमग्न राहताना<br>आगळा सच्चिदानंद<br>घामा चिंब न्हाहताना

आर्ततुझी याद आली<br>मूर्तधांधुली ये स्वपना<br>पाठीशी सदैवसत्यात<br>कृतीत ज्यांचे पाप ना

**– हेमंत मुसरीफ पुणे.**<br>**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कलासाधना सामाजिक संस्था, नवी मुंबई तर्फे पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०७, नवी मुंबई :** येथील कलासाधना सामाजिक, संस्था तर्फे दिनांक ०८ मार्च २०२६ रोजी, जागतिक महिला दिनानिमित्त 'सिंधुताई सपकाळ नारी शक्ती गौरव पुरस्कार, सिंधुताई सपकाळ जीवन गौरव पुरस्कार, भारत भूषण पुरस्कार' (पुरुष बांधवांसाठी) प्रदान करण्यात येणार आहेत. पुढील क्षेत्रातील व्यक्ती आपला प्रस्ताव पाठवू शकतात. वैयक्तिक, शिक्षण, शिक्षक, प्राध्यापक, खेळ, कला, चित्रपट, चित्रपटगृह, लिटरेचर, राजकारण, सामाजिक, चित्रकार, इतिहास, बँकिंग, वित्त, प्रेस, मीडिया, वैद्यकीय, लेखक, कवी, कलाकार, ललित कला, आरोग्य सेवा इतर क्षेत्रातील मान्यवर आपले नामांकन ७२०८१०१५८२ या क्रमांकावर पीडीएफ स्वरूपात पाठवण्याचे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे. पुरस्कार स्वरूप आकर्षक स्मृतिचिन्ह / सन्मानपत्र / पुस्तक / आकर्षक मेडल इ. पुरस्कार स्वरूप प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.पुरस्कारांसाठी आपले प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे. या पुरस्कारांसाठी आपण आपले प्रस्ताव पाठवू शकतात. प्रस्ताव/नामांकन पाठवण्याची अंतिम दि.२० फेब्रुवारी २०२६ ही असेल. त्यानंतर येणारे प्रस्ताव/नामांकन पुरस्कारांसाठी विचारात घेतले जाणार नाहीत असे संस्थे तर्फे सांगण्यात येत आहे. नामवंत आणि प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत नवी मुंबई येथे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल. पुरस्कारासाठी निवड झालेल्यानंतर त्याबाबत माहिती देण्यात येईल. जास्तीत जास्त मान्यवरांनी या पुरस्कारासाठी आपला अर्ज करावा. असे आयोजकांमार्फत आव्हान करण्यात येत आहे.

## दहावी, बारावी परीक्षार्थींच्या मदतीसाठी पोलिस 'रायडर्स' सज्ज



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, ठाणे :** दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचता यावे, यासाठी माननीय पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि सह आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे शहर वाहतूक विभागाकडून विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.परीक्षेच्या दिवशी उशीर होणे, वाहन बिघाड, वाहतूक कोंडी आदी कारणांमुळे अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांच्या मदतीला वाहतुक पोलीस सज्ज झाले आहेत. त्यानुसार, रस्त्यांवर ५४ रायडर्स तैनात केले असुन ट्राफिक कंट्रोल व्हॉटसअॅप क्रमांक व ट्राफिक कंट्रोल हेल्पलाईनसह १८ वाहतुक युनिटमध्ये संपर्क साधण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक जारी केले आहेत. तरी, परिक्षेला पोहचण्यात रस्त्यावर अडचणी उद्भवल्यास वाहतुक पोलिसांच्या हेल्पलाईनवर संपर्क करावा, असे आवाहन वाहतुक उप आयुक्त पंकज शिरसाट यांनी केले आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक (१० वी) आणि उच्च माध्यमिक (१२ वी) शालांत प्रमाणपत्र परिक्षा अनुक्रमे १० फेब्रुवारी आणि २० फेब्रुवारी पासुन सुरू होत आहेत.

या परिक्षांकरिता ठाणे पोलीस आयुक्तालयातील १ ते ५ परिमंडळात इयत्ता १२ वी ची एकुण १२६ केंद्रे तर इयत्ता १० वी ची एकुण २२३ केंद्रे आहेत. या परिक्षा केंद्रांवर परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्त्यांवर कोणत्याही कारणामुळे अडचण उद्भवल्यास ५४ रायडर्स सज्ज ठेवले आहेत. याकरिता विद्यार्थी अथवा पालकांनी वाहतूक विभागाच्या ट्राफिक कंट्रोल हेल्पलाईन क्रमांक ८२८६३००३०० व ८२८६४००४०० तसेच ट्राफिक कंट्रोल व्हॉटसअॅप क्रमांक ७०३९००३८६६ आणि १८ वाहतुक युनिटमध्येही हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध केले आहेत. याशिवाय, नियंत्रण कक्षातही तीन वाहने तैनात असणार आहेत. परिक्षाकाळात रस्त्यांवरील अडचणी संबंधित माहिती मिळताच वाहतूक पोलिसांकडून तातडीने घटनास्थळी पोहचुन वाहतुकीतील अडथळे दूर करीत विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर सुरक्षितपणे पोहोचण्यासाठी मदत केली जाणार आहे.ही सुविधा केवळ परीक्षा कालावधीसाठी उपलब्ध आहे. परिक्षा कालावधीत पालकांनी तसेच, नागरिकांनीही या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक विभागाच्या वतीने उप आयुक्त पंकज शिरसाट यांनी केले आहे.

## शहीन शपाशावली उर्स निमित्त कव्वालीचा मुकाबला



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०७, कुंडलवाडी :** शहरातील जक्कीन तलाव स्थित हजरत शहिन शफाशावली उर्स निमित्त कव्वालीचा मुकाबला कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला

संदल निमित शहरातून मिरवणूक काढण्यात आले रात्री जक्कीन तलाव स्थित दर्गा येथे फातीहा सलाम नंतर संदल कार्यक्राची सागात झाली. कव्वालीचा शनादार मुकाबला कार्यक्रम महिला कव्वाल तहसिन ताज(बंगलोर) तर पुरूष कव्वाल लुखमान ताज (नागपूर)येथील कव्वाल व त्यांचे संच मुकाबला कव्वालीत भक्तीगीत,गजल,कव्वालीचा रसीक भक्तानी मनसोक्त आनंद लुटला.यावेळी गजानन कोटलवार यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिले आणि ऊर्ससाठी एक लाखाची रोख निधी रक्कम दिली. कव्वाली कार्यक्रमाच्या सुरूवातीस हजरत जाफरसाब शिरगापूर यांचा सत्कार समितीचा वतीने करण्यात आला तद्नंतर गजानन कोटलावार,माजी उपाध्यक्ष शैलेश –याकावार,सपोनी ज्ञानेश्वर शिंदे,पोउनी गजेंद्र मांजरमकर,तसेच सर्व नवनिर्वाचित नगरसेवक,शहरातील प्रतिष्ठित नागरीकांचा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. गजानन कोटलावार,माजी उपाध्यक्ष शैलेश –याकावार यांच्या हस्ते पुरूष कव्वाल लुखमान ताज (नागपूर),महिला कव्वाल तहसिन ताज(बंगलोर)यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शहर व परिसरातील भावी भक्तानी कव्वाली कार्यक्रमास मोठ्यासंख्येने उपस्थित लावली होती.

## १० वर्षांपासून फरार असलेला आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, पाथर्डी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील पाहिजे फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले असून तब्बल १० वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीस जेरबंद करण्यात आले आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अहिल्यानगर यांनी जिल्ह्यातील पाहिजे फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांना गुन्ह्यांमध्ये अटक करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिले होते. सदर आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली सपोनि हरिष भोये, पोलीस अंमलदार सुरेश माळी, फुरकान शेख, रोहित येमुल, आकाश काळे व उत्तरेश्वर मोराळे यांचे पथक तयार करून त्यांना फरार आरोपींची माहिती काढून ताब्यात घेण्याबाबत सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सदर पथक पाथर्डी पोलीस स्टेशनच्या अभिलेखावरील पाहिजे फरार आरोपींची माहिती घेत असताना पाथर्डी पोलीस स्टेशन गु.र.नं. १६५/२०२५ भादवि कलम ४५७, ३८० मधील फरार आरोपी मिनीनाथ भाऊसाहेब भवरे (वय ३५, रा. घाटशिरस, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) हा त्याच्या राहत्या घरी आल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार पथकाने तात्काळ घाटशिरस येथे जाऊन त्याच्या राहत्या घराची खात्री केली असता सदर इसम मिळून आला. त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव मिनीनाथ भाऊसाहेब भवरे असल्याचे सांगितले. त्यानंतर पथकाने त्यास ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीस पाथर्डी पोलीस ठाणे गु.र.नं. १६५/२०२५ भादवि कलम ४५७, ३८० अन्वये पुढील तपासकामी पाथर्डी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असून पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व त्यांच्या पथकाने केली आहे.

## २४ वर्षांची देशसेवा पूर्ण करून गणेश बोडखे शेंदुर्णीत परतले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, सोयगाव :** देशातील प्रत्येक नागरिक शांत झोप घेत असताना, बर्फाच्छादित पर्वतांवर, रणरणत्या वाळवंटात आणि धोकादायक सीमारेषेवर प्राणांची बाजी लावून उभा असणारा जवान म्हणजे देशाचा खरा आधारस्तंभ होय. अशाच निःस्वार्थ भावनेतून भारतीय सेनादलात २४ वर्षे अखंड सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले शेंदुर्णी येथील जवान गणेश रामदास बोडखे यांचे गावात आगमन होताच संपूर्ण परिसर भावूक झाला.

सेवाकाळात जवान बोडखे यांनी अनेक वेळा कडाक्याची थंडी, प्रखर उन्हाळा, सततचा धोका आणि मृत्यूची छाया अनुभवली. सीमारेषेवर उभा असलेला जवान स्वतःच्या जीवाची पर्वा न करता देशाच्या सुरक्षिततेसाठी सज्ज असतो. सण, उत्सव, कुटुंबातील सुख-दुःख यापासून दूर राहून केवळ देश प्रथम या भावनेने त्यांनी आपले आयुष्य देशाला अर्पण केले.

जवान बोडखे यांच्या या अतुलनीय देशसेवेच्या सन्मानार्थ शेंदुर्णी गावात वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नारळ फोडून पूजन करण्यात आले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधानिक मूल्यांचा आदर व्यक्त करण्यात आला. पुढे हनुमानाची पूजा करून वाडी दरवाजापासून जवान गणेश बोडखे यांच्या निवासस्थानी मिरवणूक नेण्यात आली.



मिरवणुकीनंतर त्यांच्या निवासस्थानी भावनिक सत्कार समारंभ पार पडला. यावेळी शेंदुर्णी नगरपंचायतीचे नगरसेवक उपस्थित होते. त्यांनी जवान गणेश बोडखे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. भाषणात वक्त्यांनी सांगितले की, सीमेवर उभा असलेला जवान म्हणजे जिवंत ढाल असते. गोळी चालली तर ती आधी जवानावर चालते, नागरिकांवर नाही. अशा जवानांच्या त्यागामुळेच आज देश सुरक्षित आहे.

यावेळी जवान गणेश बोडखे यांच्या आई-वडिलांच्या संस्कारांचे आणि त्यागाचे विशेष कौतुक करण्यात आले.

२४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर गावात परतलेल्या जवान गणेश बोडखे यांचा हा सत्कार पाहून अनेकांच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रू तरळले. या प्रसंगी नातेवाईक, ग्रामस्थ, युवक, मित्रमंडळ, समाजसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशासाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण करणाऱ्या जवानाचा हा सन्मान न केवळ व्यक्तीचा नसून, भारतीय सेनादलाच्या शौर्याला व त्यागाला दिलेला मानवंदना असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत होती. हा सोहळा युवकांसाठी देशसेवेची प्रेरणा देणारा ठरला.

## दोन सुवर्ण पदके घेणारी देशातील एकमेव महानगरपालिका

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी मानांकित असणाऱ्या नवी मुंबई महानगर पालिकेस पथदिवे (स्ट्रीट लाईटींग) आणि इव्ही चार्जिंग स्टेशन्स या दोन उपक्रमांकरिता हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता या क्षेत्रातील कामगिरीबद्दल देण्यात येणारा राष्ट्रीय उत्कृष्टता सुवर्ण पुरस्कार प्राप्त झालेला आहे.



विशेष म्हणजे एकाच वेळी दोन उपक्रमांकरिता हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता राष्ट्रीय उत्कृष्टता सुवर्ण पुरस्कार प्राप्त करणारी नवी मुंबई ही देशातील एकमेव शहरी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून मानांकित झाली.

दिल्ली येथे ४ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या विशेष पुरस्कार सोहळ्यात नवी मुंबई महानगर पालिकेच्या वतीने विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे यांनी हे प्रतिष्ठेचे पुरस्कार स्विकारले. याप्रसंगी उपअभियंता संतोष मोरासकर उपस्थित होते.

सदर पुरस्काराबद्दल महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत तसेच आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आनंद व्यक्त करीत समस्त नवी मुंबईकर नागरिकांचे अभिनंदन केले आहे.इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स आणि डेलोईट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चौदावा ग्रीन एनर्जी समिट व सहावा ग्रीन ऊर्जा व ऊर्जा कार्यक्षमता पुरस्कार सोहळा ४ फेब्रुवारी रोजी ले मेरिडिअन, नवी दिल्ली येथे डिझायर सभागृहात संपन्न झाला.

हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता या क्षेत्रातील या पुरस्कारांची श्रेणी, प्रश्नावली व मूल्यांकन पद्धती ऊर्जा क्षेत्रातील अत्यंत अनुभवी व मान्यवर तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली होती. पुरस्कारांचे मूल्यांकन हे अत्यंत शिस्तबध्द पद्धतीने काटेकोर आणि पारदर्शक प्रक्रियेद्वारे करण्यात आले.

तपासणीच्या पहिल्या टप्प्यात ऊर्जा बचत, अक्षय ऊर्जेचा वापर, जीएचजी उत्सर्जन कपात, गुंतवणूक, परतावा, प्रमाणपत्रे, पुरस्कार व मान्यता या निकषांचा विचार करण्यात आला. त्याचप्रमाणे दुसऱ्या टप्प्यातील मूल्यांकनामध्ये नवोन्मेष (Innovation), धोरणात्मक दृष्टिकोन, प्रत्यक्ष अंमलबजावणी व शाश्वततेवरील प्रभाव यांचा सखोल अभ्यास करून पहिल्या टप्प्यासाठी ७५ टक्के तर दुसऱ्या टप्प्यासाठी २५ टक्के गुण प्रमाण ठरवून अंतिम गुण निश्चित देण्यात आले. या दोन्ही टप्प्यांतील एकत्रित गुणांच्या आधारे विजेते घोषित करण्यात आले.

पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष केंद्र सरकारच्या ऊर्जा विभागाचे माजी सचिव तथा आयसीसी उर्जा विषयक नॅशनल एक्स्पर्ट समितीचे अध्यक्ष अनिल रझदान होते. तसेच समिती सदस्य म्हणून सोलर एनर्जी कॉर्पो. ऑफ इं. लिमी. ते माजी व्यवस्थापकीय संचालक अश्विनी कुमार, सेंट्रल इलेक्ट्रिसिटी रेग्युलॅटरी कमिशनचे माजी अध्यक्ष गिरीश प्रधान, सेंट्रल इलेक्ट्रिसिटी ॲथओरिटीच्या माजी अध्यक्ष निरजा माथूर, द ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पिपल अँड प्लॅनेटचे उपाध्यक्ष सौरभ कुमार या मान्यवर तज्ञांनी सखोल परीक्षण केले.

नवी मुंबई महानगरपालिकेची ऊर्जा कार्यक्षम एलईडी स्ट्रीट लाईटींग, सौरउर्जेवरील स्ट्रीट लाईटींग व्यवस्था या उपक्रमास एक राष्ट्रीय उत्कृष्टता सुवर्ण पुरस्कार आणि इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीसाठी एक राष्ट्रीय उत्कृष्टता सुवर्ण पुरस्कार प्रदान करण्यात आला. अशाप्रकारे हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता या क्षेत्रातील दोन सुवर्ण पुरस्कार पटकाविणारी नवी मुंबई महानगरपालिका ही देशातील एकमेव शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आहे.

नवी मुंबई महानगरपालिका अंदाजित १८.५ लाख नागरिकांना विद्युत सेवा देणारे शहर असून, त्यामधील वैशिष्ट्यपूर्ण बाबी खालीलप्रमाणे आहेत –

**ऊर्जा कार्यक्षम स्ट्रीट लाइटिंग :**

एकूण ५१,३३९ ऊर्जा कार्यक्षम स्ट्रीट लाईट्स

. ५०,७२२ एलईडी लाईट्स

. ६१७ सौर स्ट्रीट लाईट्स

. यामुळे मोठ्या प्रमाणात ऊर्जा बचत व सुरक्षित रस्ते व्यवस्था

**इलेक्ट्रिक मोबिलिटी व चार्जिंग पायाभूत सुविधा:**

. ५६ ईव्ही चार्जिंग स्टेशन कार्यरत

. आणखी १४ चार्जिंग स्टेशन उभारणी प्रक्रियेत

. ई-बस सेवा व खासगी ई-वाहनांना चालना

**ऊर्जा बचत व अक्षय ऊर्जा**

. ९,१२५ चथह ऊर्जा बचत

. सार्वजनिक इमारती, शौचालये व पायाभूत सुविधांवर सौर प्रकल्प

नवी मुंबई महानगरपालिका अंदाजित १८.५ लाख नागरिकांना विद्युत सेवा देणारे नियोजित शहरांपैकी एक शहर असून, साधारणत: ९५ मेगावॅट ऊर्जा मागणी व्यवस्थापित करत आहे. या पुरस्कारामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या हरित ऊर्जा धोरणांना, ऊर्जा कार्यक्षम अंमलबजावणीला, शाश्वत व हवामानपूरक शहर विकासाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे असे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी प्रतिपादन केले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेला राष्ट्रीय स्तरावर दोन पुरस्कारांचा लाभलेला हा बहुमान नवी मुंबई महानगरपालिकेच्या नागरिक- केंद्रित धोरणांचा, परस्पर समन्वयाचा आणि हरित भविष्याकडे वाटचाल करण्याच्या दृढ संकल्पाचे द्योतक आहे. नवी मुंबई महानगरपालिकेची वाटचाल नियोजित शहराकडून आता प्लॅनेट पॉझिटिव्ह सिटीकडे समर्थपणे होत आहे.

# पारनेर तालुक्यातील विरोली गावच्या प्रशांत बुचडे जवानाला वीरमरण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील विरोली येथील सीमा सुरक्षा दलाचे जवान प्रशांत अशोक बुचुडे (वय २७) यांना देशरक्षणाचे कर्तव्य बजावत असताना नागालँडमध्ये वीरमरण आले. नागालँडमधील सटाका चौकीवर नियुक्तीला असताना मंगळवार, ०३ फ ेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. एका कर्तबगार जवानाने देशासाठी दिलेल्या या बलिदानामुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

देशसेवेचे स्वप्न आणि गौरवशाली कारकीर्द लहानपणापासूनच अंगात देशभक्ती भिनलेल्या प्रशांत यांनी देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगले होते. सैन्य दलात भरती होऊन भारतमातेची सेवा करण्याची त्यांची तीव्र इच्छा होती. आपल्या जिद्द आणि मेहनतीच्या



जोरावर ते २०२१ मध्ये सीमा सुरक्षा दलात भरती झाले. त्यांनी सीमा सुरक्षा दलाच्या १११ बटालियनमध्ये आपली सेवा सुरू केली होती. कठोर प्रशिक्षण, शिस्त आणि कर्तव्याप्रती असलेल्या निष्ठेमुळे त्यांनी अत्यंत कमी कालावधीत आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर आणि सहकाऱ्यांवर कामाची छाप पाडली होती. त्यांच्या या यशामुळे ते विरोली गावातील तरुणांसाठी एक आदर्श आणि प्रेरणास्थान बनले होते.

दुर्गम भागात बजावत होते कर्तव्य नागालँडसारख्या अत्यंत दुर्गम आणि संवेदनशील भागात देशरक्षणाची म हत्त्वाची जबाबदारी सांभाळत असताना प्रशांत बुचुडे यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. सीमेवर पहारा देताना आलेल्या या वीरमरणामुळे भारतीय सैन्याने एक तरुण आणि धाडसी जवान गमावला आहे. प्रशांत बुचडे यांच्या निधनाचे वृत्त समजताच त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात आई - वडील, एक भाऊ आणि एक बहीण असा परिवार आहे. कुटुंबाचा मुख्य आधारस्तंभ आणि घरचा कर्ता मुलगा अचानक हिरावला गेल्याने आई - वडीलांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा आहे.

हजारो जनसमुदायाच्या उपस्थित अंत्यसंस्कार शहिद जवान प्रशांत बुचडे यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी शिरोली येथे आणल्यानंतर संपूर्ण परिसरातून ऋवीर जवान अमर रहे' आणि ऋप्रशांत बुचडे अमर रहे' च्या घोषणा देण्यात आल्या.

दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी शिरोली येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सैन्य दलाच्या वतीने त्यांना शस्त्र सलामी देऊन अखेरची मानवंदना देण्यात आली.

# आधी लगीन लोकशाहीचं....?

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०७, कर्जत (ठाणे) :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी शनिवार, दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान झाले आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ जागांसाठी आणि पंचायत समित्यांच्या १,४६२ जागांसाठी निवडणुका झाल्या आहेत. एकूण ७,४३८ उमेदवार निवडणुकीसाठी पात्र आहेत आणि २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ मतदारांनी आज मतदानाचा हक्क बजावला.

अशातच कर्जतमधून एक बातमी समोर येत आहे. कर्जतमधील आत्रंड नीड गावातील नवरदेव आणि कुटुंबातील सदस्यांनी लग्न सोहळ्याला निघण्याआधी मतदान केंद्रात जाऊन रस्त्यात थांबून केले मतदान केले. कर्जत तालुक्यातील आत्रंड नीड गावातील संदेश सुरेश धुके यांचे आज लग्न आहे. पनवेल येथे लग्न सोहळ्याला जात असताना आज असलेले मतदान लक्षात घेऊन नवरदेव संदेश आणि त्यांचे कुटुंबीय हे ब्रास बँड पथक यांच्यासह वराती मधून गावातून पनवेल कडे निघाले होते.

मात्र लग्न सोहळ्यासाठी जात असताना रस्त्यामध्ये असलेल्या कशेळे जिल्हा परिषद गटाच्या मतदान केंद्रात थांबून आपल्या मतदानाचा हक्क बजावण्याचे काम करण्यात आले आहे.

दरम्यान आत्रंड नीड गावातील नवरदेव संदेश सुरेश धुळे हा आपल्या लग्नासाठी पनवेल येथील सावळे रसायनी येथे निघाला होता. रस्त्यामध्ये जिल्हा परिषद शाळा आत्रंड निड येथे वरात रस्त्यामध्ये थांबून मतदान केंद्रावर जाऊन नवरदेवाकडून मतदान करण्यात आले.तसेच नवरदेवाचे वडील सुरेश दामू धुळे आई संगीता सुरेश धुळे व भाऊ आदेश धुले या कुटुंबाने रस्त्यामध्ये नवरदेवाची वरात थांबून मतदान करत एक आदर्श निर्माण केला आहे. लग्नासाठी जात असताना रस्त्यामध्ये वरात थांबून मतदान केंद्रावर जाऊन मतदान करण्याचे काम धुले कुटुंबियांकडून करण्यात आले. लग्नासाठी विलंब होईल याचाही विचार न करता प्रथम देशाचे नागरिक आणि देश हितासाठी मतदान हे केलेच पाहिजे. असे म्हणत, रस्त्यामध्ये वरात थांबून प्रथम मतदान केले व नंतर पुढे सावळे रसायनी पनवेल येथे लग्नासाठी निघून गेले. लोकशाहीचा पाया मजबूत करण्याचे काम धुळे कुटुंबाकडून करण्यात आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,



पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर किंवा त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका जाहीर केला आहेत. त्यानुसार ५ फ ेब्रुवारी रोजी सर्वत्र मतदान झाले असते; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यानंतर मतदानाची तारीख बदलण्यात आली. त्यानुसार शनिवार, दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजे दरम्यान मतदान झाले आहे.

# आ.मुनगंटीवारांच्या हस्ते बल्लारपूर मतदारसंघात ११३ मंडळांना साऊंड सिस्टिम व ६० महिला गटांना स्वयपाकाच्या भांड्यांचे वितरण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर मतदारसंघातील गावागावांमध्ये सामाजिक आणि अध्यात्मिक बळ निर्माण करणे हेच आपले ध्येय असल्याचा निर्धार व्यक्त केला. बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील भजन मंडळे आणि महिला बचत गटांना त्यांच्या हस्ते साहित्य वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. गावागावात अध्यात्मिक वातावरण निर्माण होणे आणि महिला बचत गटांनामध्ये स्वावलंबनाचे बळ निर्माण होणे हेच या उपक्रमामागील प्रमुख ध्येय आहे. भजन, कीर्तन आणि सामाजिक उपक्रमांमुळे गावांमध्ये सकारात्मकता वाढते, तर महिला बचत गटांच्या माध्यमातून कुटुंबाच्या अर्थकारणाला हातभार लागतो. त्यामुळे सम ाजाच्या सर्व घटकांना सक्षम करण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याचे आ. मुनगंटीवार म्हणाले.

बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील मुल, बल्लारपूर, पोंभूर्णा व चंद्रपूर या चार



तालुक्यांतील विविध भजन मंडळे आणि महिला बचत गटांना साऊंड सिस्टिम व स्वयंपाकासाठी लागणाऱ्या भांड्यांचे वितरण आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते श्री कन्यका माता मंदिर सभागृह, चंद्रपूर येथे करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, श्री माता कन्यका सेवा संस्थेचे सचिव राजेश्वर सुरावार, श्रीनिवास जंगमवार, बंडू गौरकार, चंदू मारगोनवार, गौतम निम गडे, केमाताई रायपुरे, वर्षाताई लोनबले आदिंची उपस्थिती होती. या उपक्रमांतर्गत एकूण ११३ मंडळांना साऊंड सिस्टिम आणि ६० महिला बचत गटांना १५ हजार रुपये किमतीच्या स्वयंपाकाच्या भांड्यांचे वाटप करण्यात आले. मुल तालुक्यातील ५६ मंडळांना साऊंड सिस्टिम व ३२ महिला गटांना भांड्यांचे पास देण्यात आले. पोंभूर्णा तालुक्यातील २९ मंडळांना साऊंड सिस्टिम व १२ गटांना भांडी, चंद्रपूर तालुक्यातील २० मंडळांना साऊंड सिस्टिम व ८ गटांना भांडी, तर बल्लारपूर तालुक्यातील ८ मंडळांना साऊंड सिस्टिम व ८ गटांना भांडी आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वितरित करण्यात आली. गावातील नागरिक, भजन मंडळे तसेच कार्यकर्त्यांकडून या संदर्भात मागणी करण्यात आली होती. गावांमध्ये भजनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध असून साऊंड सिस्टिम उपलब्ध झाल्यास गावागावात आध्यात्मिक वातावरण निर्माण होण्यास मोठी मदत होईल, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यापूर्वीही विधानसभा क्षेत्रात पहिल्या टप्प्यात १८० भजन मंडळांना आणि दुसऱ्या टप्प्यात २३ भजन मंडळांना असे एकूण २०३ भजन मंडळांना साहित्यांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच ६५ वर्षांवरील ९,९०० ज्येष्ठ नागरिकांना काठीचे वाटप करून त्यांना आधार देण्यात आला. नेत्रचिकित्सा शिबिरांद्वारे ५० हजारांहून अधिक नागरिकांचे डोळे तपासण्यात आले असून ३५ हजार नागरिकांना चष्मे देण्यात आले. तर ७ हजारांहून अधिक रुग्णांवर म ोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. याशिवाय, चंद्रपूर येथे १४० बेड्सचे कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात आले असून अवघ्या एका महिन्यात ८०० रुग्णांनी येथे उपचार घेतले आहेत. राज्यात ज्या आधुनिक सोयी उपलब्ध नाहीत, त्या सुविधा मतदारसंघात उभारण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी आ. मुनगंटीवार यांनी सांगितले.

# शिळ अग्निशामक केंद्रासमोरील रस्त्यावरील दुभाजक तात्काळ हटवण्यासाठी सहाय्यक आयुक्तांना निवेदन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, शिळफाटा (ठाणे) :** शिळ येथील अग्निशाम क केंद्रासमोरील रस्त्यावर असलेल्या दुभाजकामुळे आपत्कालीन परिस्थितीत गंभीर अडथळे निर्माण होत असून त्याचे दुष्परिणाम नागरिकांच्या जीवित व मालम त्तेवर होण्याची दाट शक्यता आहे. कल्याण फाटा व शिळ फाटा या दोन्ही ठिकाणी नेहमीच तीव्र वाहतूक कोंडी असते. अशा परिस्थितीत अग्निशामक वाहनांना तातडीने घटनास्थळी पोहोचण्यासाठी मोठी अडचण निर्माण होते. आपत्कालीन सेवांसाठी वेळ हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो, व सद्यस्थितीत तोच वेळ या दुभाजकामुळे वाया जात आहे.

या संदर्भात अग्निशामक दलाकडून सन २०२३ पासून कार्यकारी अभियंता व नगर अभियंता (सार्वजनिक बांधकाम



विभाग) यांच्याशी सातत्याने पत्रव्यवहार सुरू आहे. तसेच एक सजग नागरिक श्री. संदेश कोळेकर यांनीही गेल्या तीन वर्षांपासून महापालिका आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त तसेच वाहतूक शाखा यांच्याकडे वारंवार निवेदने सादर केली आहेत. याशिवाय मुंब्रा वाहतूक उपविभागानेदेखील या विषयाबाबत दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांना अधिकृत पत्र दिलेले आहे. असे असतानाही आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली दिसून येत नाही, ही बाब अत्यंत दुर्दैवी व लाजिरवाणी आहे. विशेषतः जेव्हा महापालिकेच्याच एका जबाबदार विभागाने याबाबत स्पष्ट मागणी केलेली आहे. आता मनसेने दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्तांना त्यांना निवेदन दिलं आहे. जर पुढील ७ दिवसांच्या आत सदर ठिकाणचे दुभाजक हटविण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आपल्या पद्धतीने ते दुभाजक हटविण्याची कार्यवाही सुरू करेल, त्यानंतर उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार राहील, असा इशारा मनसेने दिला आहे. सात दिवसात दुभाजक पालिका हटवणार का? याकडे सर्व नागरिकांचा आता लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### पेण जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीत ७० टक्के मतदान

**अक्षराज : मितेश जाधव**



**दि.०७, पेण (रायगड) :** महाराष्ट्रात सर्वत्र आज जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका होत असताना त्या अनुषंगाने पेण तालुक्यातही सदर निवडणुका मोठ्या उत्साहात पार पडल्या यादरम्यान संध्याकाळ पर्यंत येथे जवळपास ७० टक्के मतदान झाले.यावेळी आमदार रवीशेठ पाटील यांनी आपल्या रावे येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये आपल्या मतदानाचा हक्क बजावला तर जिते गटामध्ये अनुसूचित जमातीच्या भाजप उमेदवार जोमा दरवडा यांनीही आपली लोकशाही मतदान करून बळकट केली. जिल्हा परिषदेच्या ५ गटात आणि पंचायत समितीच्या १० गणांमध्ये ही निवडणूक पार पडली यावेळी सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला झालेल्या सुरुवातीत मतदारांचा उत्साह पाहता आला त्यानंतर दुपारी थोडा मतदारांचा आकडा कमी होऊन संध्याकाळी पुन्हा मतदारांनी आपापल्या मतदान केंद्रावर ती गर्दी केली. यावेळी वडखळ येथील जय किसान विद्यामंदिर या मतदान केंद्रावर अक्षता रवी मोकल या नववधूने सर्वप्रथम मतदानाचा हक्क बजावल्यामुळे येथील प्रशासनाने त्या नववधूचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तर आंबेगाव येथील मतदान केंद्रात भूषण भालचंद्र बांद्रे या नववधू ने आंबेघर येथे मतदानं केले तसेच वढाव हद्दीत एका ८० वर्षीय वृद्ध महिलेला मतदानाला येथील कार्यकर्ते घेऊन जात होते. तर जिल्हा परिषदेच्या दादर, जिते, वडखळ, महलमिऱ्या डोंगर, शिहु या पाच गटात आणि पंचायत समिती गणांमध्ये प्रत्येक गावांतील मतदार उत्साहाने मतदान करत होते. त्यामुळे या निवडणुकीत सर्वत्र मतदान उत्साहात पार पडले असून संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास साधारणपणे ७० ते ७५ टक्के मातदान झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

### आ.दाते यांच्या प्रयत्नांना यश; क्रीडा क्षेत्रासाठी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील युवकांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन मिळावे. खेळासाठी आवश्यक पायाभूत सुविधा गावपातळीवर उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने आमदार काशिनाथ दाते यांनी सातत्याने केलेल्या विशेष पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. मतदारसंघातील विविध दहा गावांमध्ये व्यायाम शाळा विकास अनुदान योजनेंतर्गत एकूण ७० लाख रुपयांच्या क्रीडा साहित्य वितरणास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

आमदार काशिनाथ दाते यांनी मतदारसंघातील युवकांच्या मागण्या लक्षात घेऊन शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. ग्रामीण भागातील खेळाडूंना संधी मिळावी, त्यांची गुणवत्ता पुढे यावी आणि गावागावात क्रीडा संस्कृती रुजावी, या दूरदृष्टीतून हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. अखेर शासनस्तरावर त्यास मंजुरी मिळाल्याने युवक वर्गात समाधान व्यक्त होत आहे. या महत्वपूर्ण मंजुरीबद्दल आमदार काशिनाथ दाते यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, क्रीडामंत्री तसेच अहील्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री यांचे विशेष आभार मानले आहेत. त्यांच्या सकारात्मक निर्णयामुळेच मतदारसंघातील युवकांसाठी हा मोठा दिलासा मिळाल्याचे आमदार दाते यांनी नमूद केले.

क्रीडा क्षेत्राला चालना देणाऱ्या या निर्णयामुळे भविष्यात पारनेर-नगर मतदारसंघातून राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडू घडतील, असा विश्वास नागरिक व क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

> “महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागामार्फत ही मंजुरी देण्यात आली असून, संबंधित निधीअंतर्गत पारनेर तालुक्यातील जामगाव, रुईछत्रपती, राळेगण थेरपाळ, करंदी, काळेवस्ती (निघोज), पाडळी आळे, गारगुंडी, गुणोरे, काळेवाडी (सावरगाव) तर नगर तालुक्यातील कर्जुने खारे आदी गावच्या ग्रामपंचायत स्तरावर आवश्यक क्रीडा साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील युवकांना नियमित सराव, स्पर्धात्मक तयारी आणि क्रीडा कौशल्य विकासासाठी मोठा आधार मिळणार आहे.
>
> **- आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**”

### आयुक्तांची अचानक धडक; शास्त्रीनगर रुग्णालयात थेट पाहणी

**रुग्णांच्या सेवेत कसूर नको - आयुक्त गोयलांचे स्पष्ट निर्देश**

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०७, कल्याण (ठाणे) :** महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज सकाळी साडेआठच्या सुमारास डोंबिवली पश्चिम येथील शास्त्रीनगर साम ान्य रुग्णालयाला अचानक भेट देत प्रशासनाला अक्षरशः सावध केले. कोणतीही पूर्वसूचना न देता झालेल्या या पाहणीदरम्यान आयुक्तांनी रुग्णालयातील स्वच्छता, औषधसाठा, रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि एकूणच आरोग्यसेवेचा सखोल आढावा घेतला. यावेळी आयुक्त गोयल यांनी छखउण (नवजात अतिदक्षता विभाग), झखउण (बालरोग अतिदक्षता विभाग) तसेच इतर सर्व विभागांची प्रत्यक्ष पाहणी करत रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांशी आपुलकीने संवाद साधला. रुग्णांकडून थेट मिळालेल्या अनुभवावरून त्यांनी आरोग्य व्यवस्थेतील त्रुटींची नोंद घेतली. रुग्णालयात सुरू असलेल्या दुरुस्ती कामांचीही त्यांनी पाहणी करत कामाचा दर्जा आणि गती याबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारला.

महापालिका रुग्णालयातील काही रुग्णांना तातडीच्या परिस्थितीत खासगी किंवा अन्य रुग्णालयात संदर्भित करावे लागते. अशा वेळी गोंधळ टाळण्यासाठी ठोस डजझ (डींरपवरअॅव जशिअॅरींळपस झअॅलशर्वीअॅश) तयार करण्याचे स्पष्ट आदेश आयुक्तांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले. ओपीडी व अपघात कक्षात केस पेपर काढण्यासाठी रुग्णांना रोख रक्कम भरावी लागते व त्यामुळे होणारा वेळेचा अपव्यय लक्षात घेता, क्यूआर कोड आधारित केस पेपर प्रणाली लागू करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा कडक इशाराही त्यांनी यावेळी दिला. या पाहणीवेळी शास्त्रीनगर सामान्य रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.सादिया पिंजारी, डॉ.विनोद दौंड आणि बालरोगतज्ज्ञ डॉ. हेमराज देवरे उपस्थित होते.